महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ ०८ सप्टेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक - ०७६ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत ०२ रुपये

# ओबीसींच्या ताटातलं काढून सरसकट प्रमाणपत्र नाही-फडणवीस

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मराठा समाज आरक्षणापासून वंचित राहणार नाही, ओबीसींच्या ताटातील काढून घेऊन सरसकट प्रमाणपत्रं देणार नाही. काहीही झाले तर ओबीसींचे नुकसान होऊ देणार नाही. ओबीसींकरता योजना करणारे हे सरकार आहे असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "आमच्या सरकारची नीती पक्की आहे. एकाचे काढून दुसऱ्याला द्यायचे नाही. इंग्रजांनी जे केलं ते आम्ही करणार नाही. मराठा आरक्षण देताना ओबीसींना धक्का लागणार नाही. मराठवाड्यात १९४८ पर्यंत इंग्रज राज्य नव्हते, तर निजाम राज्य होते. मराठवाड्याचे रेकॉर्ड हैदराबाद गॅझेटमध्ये होते. आता ज्यांच्याकडे नोंद असेल त्याला प्रमाणपत्र दिले जाईल असे आपण सागितले आहे."



देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, "ओबीसींना जोपर्यंत मुख्य प्रवाहात आणणार नाही त्यावर त्याचा विकास होणार नाही. ओबीसी विकास होईपर्यंत शिवकार्य पूर्ण होऊ शकत नाही. कोणीही मनात शंका घेऊ नका." देव देश धर्माच्या लढ्यात हा रामोशी समाज अग्रेसर होता. ब्रिटिशांना पहिला विरोध राजे उमाजी नाईक यांनी केला. त्यांनी सेना तयार करून इंग्रजांना पळवले. रॉबर्ट यांनी पत्र लिहिले का उमाजी नाईक शिवाजी महाराज झाले असते. उमाजी नाईक हे उत्तम प्रशासक होते, स्वतःच्या हाताने त्यांनी पत्र लिहिले आहेत.

उमाजी नाईक सापडले नसते पण फितुरी झाली. शंभूराजे पण असेच पकडले गेले. राजे उमाजी नाईक यांना पकडून इंग्रजांनी फाशी दिली. पण समाजाची लढाई थांबली नाही. इंग्रजांनी गुन्हेगारी कायदा करून समाजाला गुन्हेगार ठरवले. यांना नाही दाबले तर राज्य करता येणार नाही हे माहिती होते. पण इतिहासाने या समाजाचा इतिहास कधीच पुढे येऊ दिला नाही. जवळपास ८० वर्षे गुन्हेगारी म्हणून समाज मागे गेला, त्यांचा विकास नाही झाला. आता सरकारचा प्रयत्न आहे की त्यांना त्यांचा विकास शौर्य आठवण करून द्यायचा आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणायचं असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

जोपर्यंत छत्रपती शिवाजी महाराजांसोबत लढणाऱ्या अठरापगड जातींना आम्ही मुख्य प्रवाहात आणणार नाही तोपर्यंत शिवकार्य पूर्ण होणार नाही. ओबीसींचा विकास हेच शिवकार्य आहे ते शिव कार्य केल्याशिवाय हे सरकार कधीच थांबणार नाही. त्यामुळे कुणीही मनात शंका ठेऊ नका असं आवाहन फडणवीसांनी केलं.

लक्षवेधी



## आदर्श शिक्षाविध पुरस्काराने डॉ.मनिलाल शिंपी यांचा सन्मान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** कल्याण(प्रतिनिधी) दिनांक ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनाचा निमित्ताने, जे.एम.एफ.फाउंडेशनचे चेअरमन डॉ. राजकुमार एम.कोल्हे व जे एम एफ फाउंडेशनच्या सेक्रेटरी डॉ. प्रेरणा आर. कोल्हे यांचा संकल्पनेनुसार, भारत सरकारच्या ॲटोमिक एनर्जी विभाग अंतर्गत हेवी वॉटर बोर्ड चे चेअरमन व चीफ एक्झिक्यूटिव्ह श्री.एस.सत्यकुमारअध्यक्षतेखाली , चीफ इंजीनियर अँड सायन्सटिफिक ऑफिसर (सायंटिस्ट) श्री.ए.के.सिन्हा, भारत सरकारच्या पद्मश्री पुरस्कार प्राप्त समाजसेवक गजानन माने, यांच्या प्रमुख उपस्थितीत, भारतीय ऑटोमिक एनर्जी व हेवी वॉटर बोर्डाचे सिनिअर एक्झिक्युटिव्ह बी.एम.सिन्हा, युनिव्हर्सिटी यूजीसी रिसर्च कमिटी मेंबर माजी प्राचार्य श्री.मोझेस कोलेट, हेवी वॉटर प्लांट चे इंडस्ट्रियल सेफ्टी सुपरवायझर श्री. युवराज कोल्हे यांचा हस्ते एम. एल. म्हात्रे व्यवसायिक महाविद्यालयाचे स्पोर्ट्स डायरेक्टर व के.आर. मालदे इंग्लिश स्कूल चे क्रीडा संघटक, तसेच मानवसेवा हीच खरी ईश्वरसेवा ग्रुपचे महाराष्ट्र राज्य प्रमुख,तसेच रस्ता सुरक्षा अभियान विभागीय समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) डॉ.मनिलाल रतिलाल शिंपी यांना २०२५ चा आदर्श शिक्षाविद पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सातपुड्यातील संपूर्ण आदिवासी असलेला नंदुबार जिल्ह्यात शहादा तालुक्यातील परिवर्धे येथील सुपुत्र, डॉ. मनिलाल शिंपी हे "जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले तोची साधू ओळखावा देव तेथेची जाणावा" या ओवी नुसार, व राष्ट्रसंत गाडगे महाराज व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रेरणेतून, मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा या संकल्पनेनुसार जे कार्य करीत आहेत महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील गोरगरीब गरजू लोकांपर्यंत शक्य असेल ती मदत पोहोचवण्याचे स्तुत्य असे कार्य ते करीत आहेत तसेच एवरी संडे रोटी डे ग्रुपच्या माध्यमातून आदिवासी पाडा, कातकरी पाडा, विटभट्टी कामगार अशा ठिकाणी प्रत्येक रविवारी सकाळी मिष्ठांन भोजन वाटप करणे, पटनाट्याद्वारे जनजागृतीचे उल्लेखनीय कार्य करीत आहेत. तसेच आपत्कालीन परिस्थितीत गणेशोत्सव, नवरात्र उत्सव, निवडणूक कालावधी, यात्रा या ठिकाणी पोलीस प्रशासनाला सहकार्यासाठी सदैव तत्पर असणारे मनिलाल शिंपी यांच्या कार्याचा गौरव अभिमानास्पद आहे.



## अखेर ३३ तासांच्या प्रतीक्षेनंतर लालबागच्या राजाचे विसर्जन संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबईच्या सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनाचा अविभाज्य भाग असलेल्या लालबागच्या राजाचे यंदाचे विसर्जन 33 तासांच्या भक्तिमय मिरवणुकीनंतर अखेर गिरगाव चौपाटीवर संपन्न झाले. लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या या गणपतीच्या विसर्जनाला यंदा अनेक आव्हानांचा सामना करावा लागला. समुद्रातील भरती आणि नव्या स्वयंचलित तराफ्यामुळे निर्माण झालेल्या अडथळ्यांमुळे विसर्जन प्रक्रिया लांबणीवर पडली. तरीही, भाविकांचा उत्साह आणि श्रद्धा यामुळे बाप्पाला भक्तीमय निरोप देण्यात यश आले.

लालबागच्या राजाची विसर्जन मिरवणूक शनिवारी (6 सप्टेंबर) सकाळी 10 वाजता लालबाग येथून सुरू झाली. रंगीबेरंगी फुलांनी सजवलेला तराफा, ढोल-ताशांचा गजर आणि "गणपती बाप्पा मोरया" च्या जयघोषांनी मुंबईच्या रस्त्यांवर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. रात्रभर चाललेली ही मिरवणूक रविवारी सकाळी 8 वाजता गिरगाव चौपाटीवर पोहोचली. मिरवणुकीत लाखो भाविकांनी सहभाग घेतला, तर रस्त्याच्या दुतर्फा हजारो लोकांनी बाप्पाचे दर्शन घेतले. विसर्जनावेळी अनंत अंबानी यांच्या सुरक्षा रक्षकांनी आणि कोळी बांधवांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

## अंबरनाथ नगरपरिषदेकडून मानसिक आरोग्यावर मार्गदर्शन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथः** शहरी बेघर नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी अंबरनाथ नगर परिषद सातत्याने सकारात्मक पावले उचलत आहे. दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत चालविण्यात येणाऱ्या पश्चिमेतील उलनचाळ येथील शहरी बेघर निवारा केंद्रात लाभार्थ्यांसाठी मानसिक आरोग्याविषयी मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

ही कार्यशाळा ठाणे मानसिक रुग्णालय आणि हेल्प एज महाराष्ट्र संस्थेच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आली. मार्गदर्शनासाठी ठाणे सिव्हिल हॉस्पिटलचे मानसोपचारतज्ज्ञ डॉ. यशवंत सोळंकी, तसेच हेल्प एज महाराष्ट्र संस्थेचे प्रतिनिधी मीरांडा आणि कल्पेश वाकडे उपस्थित होते. या सत्रात लाभार्थ्यांना मानसिक आजारांची लक्षणे, त्यांची कारणे आणि त्यावर उपाययोजना याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. नैराश्य चिंता स्मृतिभ्रंश यांसारख्या विकारांची लक्षणे वेळेवर ओळखून त्यावर उपाय करणे किती गरजेचे आहे हे सांगण्यात आले. तज्ज्ञांनी शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित केले. "मन निरोगी तर तन निरोगी," या भावनेतून लाभार्थ्यांना दैनंदिन जीवनात सकारात्मक विचार, नियमित दिनक्रम, सामाजिक संवाद आणि साध्या आनंददायी गोष्टींचा अवलंब करण्याचे प्रोत्साहन देण्यात आले.

"मानसिक आरोग्य हा दैनंदिन जगण्याचा अविभाज्य भाग आहे. त्याची काळजी घेतल्यास आपण आपले जीवन अधिक सुखकर आणि समाधानकारक बनवू शकतो," अशी प्रतिक्रिया आयोजकांनी दिली. या सत्रास निवाऱ्याचे व्यवस्थापक, काळजीवाहक तसेच नगर परिषदेचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## मुंबई उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय
### भ्रष्ट अधिकारी व न्यायाधीशांविरुद्ध निर्णायक पाऊल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या एका महत्त्वपूर्ण निर्णयाने तहसीलदार, जिल्हाधिकारी, मंत्री तसेच न्यायाधीश यांच्यासह न्यायिक आणि अर्धन्यायिक अधिकाऱ्यांच्या मनमानी व बेकायदेशीर आदेशांवर कडक लगाम बसला आहे. हा निर्णय केवळ एका प्रकरणापुरता मर्यादित नसून, पुढील काळात संपूर्ण न्यायव्यवस्थेच्या कामकाजासाठी मार्गदर्शक ठरेल असा ठोस संदेश देतो.



गेल्या अनेक दशकांपासून असे दिसून येत होते की काही न्यायिक व अर्धन्यायिक अधिकारी, विशेषतः सहकारी संस्थांचे रजिस्ट्रार व त्यांच्यासारखे निर्णय देणारे अधिकारी, कायद्याचा गैरवापर करून श्रीमंत व प्रभावशाली लोकांच्या दबावाखाली आदेश पारित करीत. अशा आदेशांमध्ये कायदेशीर प्रक्रियेची पायमल्ली, तथ्यांचे दडपण आणि न्याय्य हक्कांचे उल्लंघन या गोष्टी स्पष्टपणे दिसून येत होत्या.

आजच्या वास्तवाकडे पाहिले तर हे उघडपणे जाणवते की सामान्य नागरिकांचे आणि होतकरू वकिलांचे हक्क अनेकदा पायदळी तुडवले जातात. रजिस्ट्रार, तहसीलदार, जिल्हाधिकारी ते अगदी काही न्यायाधीशसुद्धा — कायद्याचे अक्षरशः खेळणे करून श्रीमंत, प्रभावशाली व दलालांच्या बाजूने निर्णय देतात. शब्दांची कसरत, कायद्याची मोडतोड आणि प्रक्रियेचा दुरुपयोग ही त्यांची नेहमीची पद्धत बनली आहे. अशा परिस्थितीत साधारण नागरिकाने किंवा तरुण वकिलाने अन्यायाविरुद्ध आवाज उठवायचा ठरवला, तर त्याच्यासमोर मोठे आव्हान उभे राहते — वेळखाऊ खटले, प्रचंड खर्च आणि सत्ताधाऱ्यांचा दबाव. या सर्वांमुळे न्याय मिळवणे म्हणजे अवघड नव्हे तर जवळजवळ अशक्य कार्य ठरते.

याशिवाय, जो कोणी तरी धाडस करून आवाज उठवतो, त्याला गप्प करण्यासाठी भ्रष्ट अधिकारी, काही न्यायाधीश, त्यांचे दलाल वकील आणि सुपारीबाज वकिल संघटना मिळून मोहीम उघडतात. त्याच्यावर खोट्या तक्रारी, धमक्या, अपमान व मानसिक त्रासाचे डोंगर लादले जातात. अशा वातावरणामुळे न्यायासाठी लढणाऱ्यांचे मनोधैर्य खचवण्याचा प्रयत्न केला जातो.

मात्र, मुंबई उच्च न्यायालयाच्या अलीकडील निर्णयाने या सर्व दबावतंत्राला आणि खोट्या दाव्यांना जोरदार चपराक दिली आहे. या निर्णयाने स्पष्ट केले आहे की कायद्याचा गैरवापर करणाऱ्या व न्यायव्यवस्थेला कलंक लावणाऱ्या कोणालाही — तो रजिस्ट्रार असो, तहसीलदार, जिल्हाधिकारी किंवा न्यायाधीश — कायद्याच्या जबाबदारीपासून सुटका मिळणार नाही.

हा निर्णय केवळ कायद्याचा तांत्रिक विजय नाही, तर सत्यासाठी लढणाऱ्या सामान्य नागरिकांच्या व होतकरू वकिलांच्या हातातले शस्त्र आहे. यामुळे आता अन्यायाविरुद्ध आवाज उठवणाऱ्यांचा आत्मविश्वास वाढला आहे, आणि दलाल व भ्रष्ट गटांचा खोटा दबाव कोसळून पडला आहे.

नवीन निर्णयामुळे मात्र अशा अधिकाऱ्यांना स्पष्ट इशारा देण्यात आला आहे की, कायद्याच्या चौकटीबाहेर जाऊन दिलेला आदेश हा केवळ आव्हानास पात्र नाही तर त्यावरून संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध थेट चौकशी, निलंबन, बडतर्फी व फौजदारी कारवाई देखील होऊ शकते. त्यामुळे न्यायिक व अर्धन्यायिक अधिकाऱ्यांच्या मनमानी व बेजबाबदार वर्तनावर कठोर अंकुश बसणार आहे. इंडियन बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. निलेश ओझा तसेच त्यांचे सहकारी ॲड. विवेक रामटेके, ॲड. इश्वरलाल अग्रवाल, ॲड. विजय कुरले, श्री. रशीद खान पठाण आणि यांसारख्या निडर वकिलांनी गेली दोन दशके न्याय व्यवस्थेतील भ्रष्ट प्रवृत्तीविरुद्ध सातत्याने व निर्भीडपणे लढा दिला आहे. या लढ्यामध्ये त्यांनी केवळ न्यायालयीन मार्गांचा वापर करून अनेक भ्रष्ट अधिकारी, न्यायाधीश व त्यांच्या दलालांची पोलखोल केली नाही, तर सर्वसामान्य नागरिकांमध्येही जागृती निर्माण केली.






# प्रा.शिक्षक अविनाश सुरोसे जिल्हा आदर्श पुरस्काराने सन्मानित!



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : मुरबाड तालुक्यातील तुळई केंद्रातील जिल्हा परिषद शाळा कळंभे येथील पदविधर शिक्षक श्री. अविनाश तुकाराम सुरोसे यांनी केलेले शैक्षणिक क्षेत्रातील योगदान व सामाजिक कार्याची दखल घेऊन जिल्हा परिषद शिक्षण विभाग ठाणे यांच्या कडून जिल्हा आदर्श पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

नुकताच ठाणे येथे झालेल्या आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा 2025 या कार्यक्रमात पदवीधर आमदार निरंजन डावखरे, कोकण विभाग शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व शिक्षणाधिकारी रावसाहेब राक्षे यांच्या उपस्थितीत जिल्हा आदर्श पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

अविनाश सुरोसे हे गेली 32 वर्षे शिक्षक म्हणून ज्ञानदानाचे काम करत आहेत. आजपर्यंत त्यांनी केंद्र शाळा वैशाखरे, केंद्र शाळा बळेगांव उमरोली, व जिल्हा परिषद शाळा टेंभरे बु. या शाळांवर अतिशय चांगले काम केले आहे.विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी सतत त्यांचा प्रयत्न असतो. सदर शाळेसाठी विविध दानशूर व्यक्तींकडून मदत मिळवून शाळांचा कायापालट केला आहे. सध्या अविनाश सुरोशे हे कळंभे शाळेत कार्यरत असून शाळेचे मुख्याध्यापक आहेत. समाज सहभागातून त्यांनी ही शाळा डिजिटल बनवली असून प्रत्येक वर्गात स्मार्ट टिव्ही,शाळेत सि.सि.टिव्ही कॅमेरे, सौर उर्जा प्रकल्प, रेन हार्वेस्टिंग वॉटर योजना, शुध्द पाणी पुरवठ्यासाठी फिल्टर योजना,शाळेसाठी साऊंड सिस्टीम योजना व शाळेला पूर्ण रंगरंगोटी समाज सहभागातून केली आहे.विद्यार्थी गुणवत्ता चांगली असून,शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश प्राप्त केले आहे.अशाप्रकारे कळंभे शाळा तुळई केंद्रातील एक आदर्श शाळा झालि आहे. गावातील पालकांचे शाळेबद्दल अतिशय चांगले मत असून, सदर शाळेचा कायापालट करण्यात अविनाश सुरोशे सरांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या या शैक्षणिक कामाची दखल घेऊन त्यांना यावर्षीचा जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला आहे.

त्यांच्या या सन्माना बद्दल मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे, स्वाभिमान शिक्षक संघटने राज्य अध्यक्ष यादव पवार यांच्यासह सर्व शिक्षक संघटनेच्या वतीने व समस्त मुरबाड करांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# गिरगाव चौपाटीवर मुख्यमंत्र्यांचा गणरायाला निरोप

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : महाराष्ट्र शासनाने गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा दिला आहे, त्या उत्सवाचा जल्लोष आज गिरगाव चौपाटीवर उच्चांक गाठताना दिसला. या सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः उपस्थित राहून गणरायाला निरोप दिला.

राज्य महोत्सवाच्या या उत्साहात गीरगाव चौपाटीवर विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री मंगलप्रभात लोढा, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, राज्यमंत्री योगेश कदम, आमदार अमित साटम, मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी, अतिरिक्त आयुक्त अमितकुमार सैनी तसेच हजारो भाविक यांची उपस्थिती होती. ढोल-ताशांच्या गजरात आणि “गणपती बाप्पा मोरया”च्या गजरात वातावरण भारावून गेले होते. बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबईतील गिरगाव चौपाटी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सभापती प्रा. राम शिंदे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक मान्यवरांनी गणेश मूर्तींवर पुष्पवृष्टी करून गणरायांना निरोप दिला.

राज्यात दहा दिवसांचा गणेशोत्सव उत्साहात आणि शांततेत पार पडल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. “लोकांनी हा उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला. बाप्पाच्या विसर्जनावेळी मनात थोडीशी खंत व दुःख होते, कारण दहा दिवसांनी बाप्पा आपल्याला सोडून जातात. पण याचबरोबर पुढच्या वर्षी ते परत येणार आहेत याचा आनंदही असतो,” असे श्री. फडणवीस म्हणाले.

मुंबई, पुणे तसेच राज्यातील सर्व शहरांमध्ये, गावांमध्ये गणेशोत्सवाच्या मिरवणुका शांततेत व शिस्तीत पार पडल्या. “पोलीस विभाग, महानगरपालिका आणि स्थानिक प्रशासन यांनी केलेल्या व्यवस्थेमुळे हा उत्सव सुरळीत पार पडला. त्यांचे काम कौतुकास्पद आहे,” असेही श्री. फडणवीस यांनी सांगितले.

गिरगाव चौपाटीवरील विसर्जन सोहळ्याला मुंबईकरांसोबत विविध मान्यवरांचीही उपस्थिती होती. मुंबई महानगरपालिका, पोलिस व स्वयंसेवकांच्या मदतीने विसर्जनाची व्यवस्था करण्यात आली.







# ८७५ वर्षांनी सप्टेंबरमध्ये होतेय भाद्रपदामधील खग्रास चंद्रग्रहण

शिलाहार राजेशाहीच्या काळात महाराष्ट्र प्रांतात सर्वाधिक शिलालेख, ताम्रपटांचे लेखन झाले. या ऐतिहासिक शिलालेख आणि ताम्रपटांच्या माध्यमातून इसवी सन काळापासून होत असलेली सूर्यग्रहणे आणि चंद्रग्रहणे यांची माहिती मिळते. महाराष्ट्र, गोवा भागात एकूण ७२६ शिलालेख आणि ताम्रपट आहेत. या शिलालेखांवरील वर्णनावरून रविवार, ता. ७ सप्टेंबर (भाद्रपद) रोजी रात्री ९.५७ वाजता लागणारे चंद्रग्रहण हे तब्बल ८७५ वर्षांनी पुन्हा यापूर्वीच्या तारखेला एक दिवसाच्या अंतराने होत आहे, अशी माहिती कल्याणच्या इतिहासाचे अभ्यासक डॉ. श्रीनिवास साठे यांनी काही ऐतिहासिक संदर्भाच्या माध्यमातून दिली आहे.

रविवार, आज ९ सप्टेंबर रोजी खग्रास चंद्रग्रहण रात्री ९.५७ वाजता लागणार आहे आणि ते रात्री १.२७ वाजता सुटणार आहे. या खग्रास चंद्रग्रहणाचा स्पर्श रात्री ९.५७, सम्मीलन रात्री ११ वाजता, ग्रहण मध्य रात्री ११.४२ वाजता, ग्रहण उन्मीलन रात्री १२.२३ आणि ग्रहण मोक्ष (सुटणे) रात्री १.२७वाजता होणार आहे. या ग्रहणाचा पर्वकाल तीन तास ३० मिनिटे असणार आहे, असे अभ्यासक डॉ. श्रीनिवास साठे यांनी सांगितले.

इसवी सन काळापासून जी सूर्यग्रहणे आणि चंद्रग्रहणे झाली त्यांची माहिती आपणास महाराष्ट्र, गोवा राज्यातील विविध भागात असलेल्या शिलालेख आणि ताम्रपटातून मिळते. महाराष्ट्र आणि गोवा राज्यात एकूण ७२६ शिलालेख आणि ताम्रपट आहेत. या शिलालेख आणि ताम्रपटांच्या माध्यमातून इसवी सनाच्या काळात झालेली १९ सूर्यग्रहणे आणि १७ चंद्र ग्रहणे यांची माहिती मिळते. ग्रहणांची माहिती मिळण्यासाठी इतर दस्तऐवजांबरोबर शिलालेख,



**इतिहासकालीन बहुतांशी शिलालेख, ताम्रपट हे शिलाहार राजांच्या काळात दिसतात. त्यानंतर कागद, मुद्रणे आली त्यानंतर शिलालेख, ताम्रपटाचे प्रमाण कमी झाले. त्यानंतर राजेशाहींमध्ये दानपत्र, कागदपत्रांचा वाढला. नंतरच्या काळात ताम्रपट, शिलालेखांचे प्रमाण कमी दिसते. शिलालेख, ताम्रपट हे इतिहासाचे भक्कम संदर्भ आहेत.**
**– डॉ. श्रीनिवास साठे, इतिहासाचे अभ्यासक.**

ताम्रपट हे सबळ पुरावे आहेत. यापूर्वीची दोन चंद्रग्रहणे ही भाद्रपदामध्ये झालेली आहेत असे विविध भागातील शिलालेखावरून स्पष्ट झाले आहे, असे डॉ. साठे यांनी सांगितले.

कोल्हापुरचा शिलालेख

रविवार, ७ सप्टेंबर रोजी होणारे रात्रीच्या वेळेतील खग्रास चंद्रग्रहण तब्बल ८७५ वर्षांनी यापूर्वीच्या तारखेच्या एक दिवस अगोदर भाद्रपद महिन्यात होत आहे. ग्रहण सुटण्याचा काळ विचारात घेतला तर ८७५ वर्षांनी ज्या दिवशी चंद्रग्रहण होते त्याच दिवशी रविवार, ७ सप्टेंबरचे चंद्रग्रहण आले आहे. ८७५ वर्षापूर्वीनी भाद्रपद महिन्यात होणाऱ्या चंद्रग्रहणाची माहिती देताना डॉ. श्रीनिवास साठे यांनी जुने शिलालेखाचे संदर्भ देऊन सांगितले, की महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील बामणी गावाजवळ नैऋत्य दिशेला जैन मंदिराच्या प्रवेशद्वारा जवळ एका शिळेवर शिलाहार काळातील महामंडलेश्वर राजा विजयादित्य यांच्या कारकिर्दीतील एक शिलालेख आहे.

या शिलालेखावर शके १०७३, भाद्रपद पौर्णिमा, चंद्रग्रहण, प्रमोद सवंत्सर, शुक्रवार, ८ सप्टेंबर ११५० या कालावधीत झालेल्या चंद्रग्रहणाची माहिती दिली आहे. हा शिलालेख संस्कृत, प्राचीन कानडी लिपित आहे. इसवी सन ११५० मध्ये भाद्रपद महिन्यात झालेल्या चंद्रग्रहणाचा विचार केला तर रविवार, ७ सप्टेंबर रोजी भाद्रपदात होणारे चंद्रग्रहण तब्बल ८७५ वर्षांनी होत आहे, असे डॉ. श्रीनिवास साठे यांनी सांगितले.

अशाच प्रकारे भाद्रपदात झालेल्या चंद्रग्रहणाचा उल्लेख अकोला तालुक्यातील मूर्तिजापूर तालुक्यातील सीसवे ताम्रपटात आहे. हा ताम्रपट सिरसोच्या एका मुसलमानाजवळ मिळाला. तो नागपूरच्या सेंट्रल म्युझियममध्ये आहे. संस्कृत भाषेतील हा ताम्रपट राष्ट्रकुट राजा गोविंद (तिसरा) याच्या काळात कोरला आहे. या ताम्रपटावर भाद्रपद पौर्णिमा व्यय संवत्सर, शके ७२९, शनिवार २१ ऑगस्ट ८०७ मध्ये झालेल्या चंद्रग्रहणाचा उल्लेख आहे.

कोल्हापूर बामणी येथील शिलालेखात राजा विजयादित्यची वंशावळ दिली आहे. हा शिलालेख अभिनंददेव यांचा शिष्य व सुवर्णकार बम्योज यांचा पुत्र गोव्योज याने कोरलेला आहे, असे डॉ. साठे यांनी सांगितले.

## रेसिपी

### तांदळाची खीर



साहित्य :

तांदूळ - 1 वाटी
दूध - 1/2 लिटर
ड्रायफ्रूट्स - 2 चमचे
वेलची पावडर - 1 चमचा

कृती :

तुपात ड्रायफ्रूट्स भाजून एका प्लेटमध्ये काढा. तांदूळ धुवून लालसर भाजून घ्यावा.त्यातच दूध घाला.दूधाला उकळी आली की, त्यात 1 चमचा वेलची पावडर घालून चमच्याने ढवळत राहा.आता साखर घाला.खीर मंद आचेवर शिजवत राहा.
खिरीवर साय दिसू लागली की, तुमची तांदळाची खीर खाण्यास तयार झाली आहे.

# जीवनदीप महाविद्यालयाच्या NSS स्वयंसेवकांचे गणेश विसर्जनावेळी सहकार्य



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**खर्डी** : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खर्डीच्या NSS स्वयंसेवकांनी ६ सप्टेंबर रोजी झालेल्या गणेश विसर्जनावेळी पोलिस प्रशासनास मदत केली. स्वयंसेवकांनी गर्दी व वाहतूक नियंत्रणासोबतच निर्माल्य संकलनाची जबाबदारी पार पाडली.

या उपक्रमात सहाय्यक पोलिस निरीक्षक मा. जाधव सर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम अधिकारी प्रा. राहुल सोनावणे, संस्थाध्यक्ष मा. रविंद्र घोडविंदे व प्राचार्य कैलास कळकटे यांच्या प्रेरणेने उपक्रम यशस्वी झाला.

# आगमनापासून ते विसर्जनापर्यंत भिवंडी मनपाचे गणेशोत्सवासाठी अचूक नियोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : गणपती बाप्पा मोरया,पुढल्या वर्षी लवकर या.. गजरांत गणरायांना भावपूर्ण निरोप भिवंडीमध्ये गणपती बाप्पांचे मोठ्या जल्लोषांत विसर्जन..

गणपती बाप्पा मोरया अशा जय घोषांत घरगुती व सार्वजनिक गणपती बाप्पांचे आगमन झालेले असून, अनंत चतुर्दशीच्या दिवशी १० दिवसांचे २०९४ घरगुती, तर ३८७ सार्वजनिक गणपतींचे असे एकूण २४८१ गणपती मूर्तीचे विसर्जन झाले. या गणेशोत्सव २०२५ च्या बाप्पांच्या आगमनापूसन ते विसर्जनापर्यंत भिवंडी महानगरपालिकेच्यावतीने गणेश भक्ताना पुरविल्या जाणा-या विविध सेवा सुविधा पुरविण्यासंबंधी अचूक नियोजन करून हा सण निर्विघ्नपणे पार पडला. संबंधित सर्व विभागांनी आपापल्या कामाचे योग्य नियोजन आणि विविध विभागांमध्ये योग्य समन्वय साधल्याने गणेशोत्सव कालावधीमध्ये कोणत्याही सेवा-सुविधा अपु-या पडणार नाहीत याची काळजी घेऊन भिवंडी महानगरपालिका पूर्ण तयारीनिशी सज्ज असल्याची माहिती मनपा चे प्रशासक तथा आयुक्त श्री अनमोल सागर (भा.प्र.से.) यांनी दिली.

या वर्षी महानगरपालिकेने एकुण १० कृत्रीम तलाव उपलब्ध करुन दिले होते. या वर्षी एकूण ७२२ मूर्तीचे कृत्रिम तलावात विसर्जन केले. मागील वर्षी १९३ गणपती मूर्तीचे विसर्जन कृत्रिम तलावात झाले होते. त्या तुलनेत या वर्षी जवळपास ३.५ पट जास्त मूर्तीचे विसर्जन कृत्रिम तलावात विसर्जन झाले. गणेश भक्तांनी देखील या कृत्रिम तलावांच्या सुविधेवर समाधान व्यक्त केले असून पुढील वर्षी यामध्ये अजून वाढ व्हावी अशी देखील अपेक्षा व्यक्त केली. यावेळी गणेश आगमन व विसर्जन मार्गावर प्रत्येक एक अधिका-याची तर विसर्जन घाटांवर प्रत्येक दोन समन्वय अधिकारी नियुक्ती करण्यात आली होती. या सर्व व्यवस्थेमुळे गणपती विसर्जन अत्यंत सुरळीतपणे पार पडले.



नागरिकांनी देखील महानगरपालिकेच्या सुविधांवर समाधान व्यक्त करुन, कामाची पोच पावती दिली.

परंपरेनुसार गुलाल व फुले पाकळयांची उधळण करीत गणपती बाप्पा मोरया, पुढल्या वर्षी लवकर या !! या गणेशभक्तांच्या जयघोषाने संपूर्ण भिवंडी शहर दुमदुमत, भिवंडीकरांनी आपल्या लाडक्या विघ्नहर्त्या गणपतींचे भावपूर्ण वातावरणांत भिवंडी महानगरपालिकेच्या नदिनाका-टिळक घाट, व-हाळादेवी येथील व-हाळदेवी, कामतघर, फेणे हे विसर्जन घाट, भादवड तलाव, नारपोली व अन्य तलाव अशा विसर्जन घाटांवर विसर्जन करीत श्रीं गणरायांना भावपूर्ण व श्रध्दाभक्तीपूर्ण निरोप देत गणेशोत्सव सण शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणांमध्ये संपन्न झाले.

भिवंडी महागरपालिकेने गणपती विसर्जन व्यवस्थित करण्यासाठी ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शहरातील विसर्जन घाटांवर विद्युत, मंडप व्यवस्था, श्रींच्या विसर्जनासाठी तराफे, जीवन रक्षक पथक नियुक्ती, अग्निशमन व मनपाच्या अधिकारी-कर्मचा-यांच्या नियुक्त्या करुन कोणतीही दुर्घटना होणार नाही याची विशेष दक्षता घेतली होती. वैद्यकिय आरोग्य विभागांचे वैद्यकिय अधिकारी कर्मचारी ॲम्बुलन्स्, औषधोपचार साधन-सामुग्रीसह उपस्थित होते.

# जड अंतःकरणाने लाडक्या गणरायाचे विसर्जन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : भाद्रपद महिन्यात गणेशोत्सव मंडळ व गौरी गणपतीचे अनेक ठिकाणी भेट घेऊन मनोभावे दर्शन घेतले आरतीचा मान ही मिळाला तसेच मुबंई पत्रकार म्हणून सत्कार करण्यात आला.तसेच गणपती विसर्जन घाटावर व विसर्जन सोहळ्यात ही सहभाग घेवून समाजा प्रती कर्तव्य बजावले.मा.खासदार संजय पाटील यांच्या गणरायाचे दर्शन व सत्कार करण्यात आला.अनेक बातमीपत्राचे कात्रन मंडळात सुपूर्द केले .मुलुंडचा महाराजा अंबिका नगर दर्शन व सत्कार करण्यात आला. साल्पादेवी मित्र मंडळ दर्शन व सत्कार करण्यात आला. दत्तगुरू प्रतिष्ठान वडार वाडा दर्शन व सत्कार करण्यात.तरुण बाळ मित्र मंडळ नाहूरगाव यंदा ५०वर्ष होते. भेट घेऊन विसर्जन सोहळ्यात सहभाग घेतला.आरती मान मिळाला. शिवसेना १०८ शाखाप्रमुख शैलेश पवार यांच्या गणरायाचे दर्शन, मनसे मुलुंड विभाग अध्यक्ष राजेश चव्हाण यांच्या गणरायाचे दर्शन, अनेक गणेश मंडळास भेट देवून मनोभावे दर्शन घेण्यात आले.आज विसर्जन सोहळ्यात माजी नगरसेवक गंगाधरे यांच्या स्वागत कक्षाला भेट दिली .तसेच माजी आमदार चरणसिंग सप्रा जी व अध्यक्ष कैलास पाटील यांच्या स्वागत कक्षाला भेट देवून गणेश भक्तांचे स्वागत केले.

"गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या "! असा उत्साहपूर्ण वातावरणात बाप्पाला निरोप देण्यात आला.






## आजचे राशि भविष्य




**मेष**

ऑफिसला लवकर जाण्याचा प्रयत्न कराल आणि तुम्हाला आवडेल ते काम कराल. पूर्वी गुंतवलेल्या पैशाचा फायदा आज तुम्हाला मिळू शकतो.

**वृषभ**

तुम्ही नफा मिळवाल आणि तुमची आर्थिक स्थिती मजबूत कराल.नोकरी करणाऱ्या लोकांना कामाच्या ठिकाणी दिलेली कामे वेळेवर पूर्ण करावी लागतील.

**मिथुन**

शैक्षणिक क्षेत्रात यश मिळेल. तुम्हाला तुमच्या जोडीदाराकडून सहकार्य मिळेल. आज तुम्ही सक्रिय राहाल आणि तुमचे आरोग्य तुम्हाला पूर्ण साथ देईल.

**कर्क**

कुटुंबातील सर्व सदस्य एकत्र पार्टीत सामील होतील, जिथे इतर लोकांशी संवाद साधला जाईल. एखाद्या खास व्यक्तीला भेटून तुमचे प्रलंबित काम पूर्ण होईल.

**सिंह**

तुमच्या कामात कुटुंबाकडून सहकार्य मिळेल. तसेच, आज काही कौटुंबिक जबाबदाऱ्या तुमच्यावर सोपवण्यात येतील, ज्या तुम्ही पूर्ण कराल.

**कन्या**

वरिष्ठांकडून चांगली बातमी मिळेल. व्यवसाय करणारे लोक नवीन योजना राबवतील, जेणेकरून व्यवसाय पुढे जाईल. कुटुंबाकडून सहकार्य मिळेल.

**तूळ**

कोणत्याही मदतीशिवाय पैसे कमवू शकाल, तुम्हाला फक्त स्वतःवर विश्वास ठेवण्याची गरज आहे. मित्रांच्या मदतीने तुम्हाला नवीन संपर्क प्राप्त होतील.

**वृश्चिक**

तुमच्या क्षमता ओळखा कारण तुमच्यात ज्याची कमतरता आहे ती ताकद नसून इच्छाशक्ती आहे. तुमचा मित्र तुम्हाला भेटायला येईल.

**धनु**

तुम्ही केलेल्या कामावर प्रत्येकजण खूश दिसतील. तुम्ही तुमची सर्व कामे वेळेवर पूर्ण करण्यात यशस्वी व्हाल. तुम्हाला उत्पन्नाच्या संधी मिळतील,

**मकर**

कुटुंबातील सर्व सदस्य मिळून एखाद्या धार्मिक स्थळाला भेट देण्याची योजना आखतील. नोकरदार लोकांना त्यांच्या नोकरीत प्रगतीची संधी मिळेल.

**कुंभ**

तुमचा व्यवसाय पुढे नेण्यात तुम्ही यशस्वी व्हाल. शैक्षणिक क्षेत्रात यश मिळेल. आज तुम्हाला कुटुंबाकडून सहकार्य मिळेल.

**मीन**

दैनंदिन दिनचर्येत चालण्याचा समावेश कराल, ज्यामुळे खूप उत्साही वाटेल. मित्राला तुमच्या क्षमतेनुसार मदत कराल. उर्जा पातळी उच्च राहील.

नियमित वाचा दै. ठाणे जीवनदीप वार्ता

# गणेशोत्सवाला गालबोट!

## विसर्जनादरम्यान राज्यात नऊ जणांचा मृत्यू

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : आपल्या भक्ताची संकटे, विघ्ने दूर करणाऱ्या 'विघ्नहर्त्यालाच कच-याचे ढिग, दुर्गंधी, खड्डे, चिखल अशा संकटातून साश्रू नयनांनी निरोप द्यावा लागला असल्याने गणेशभक्तांमध्ये कमालीचा संताप पसरला आहे तर ,दुसरीकडे शहापूरमधील मुंडेवाडी गावचे तीण तरुण भांरिगे नदीत बुडाले, आणि आज सकाळी दहा वाजता गणेशोत्सवानंतर घरी जात असताना कल्याण नगर मार्गावरील मुरबाड मधील शिरोशी पाडा, जवळ एसटी ला अपघात झाल्याने दोन प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. राज्यात विविध घटनामध्ये ९ गणेशभक्तांचा मृत्यू झाल्याने गणेशोत्सवाला गालबोट लागले आहे.

संपूर्ण महाराष्ट्रात गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो, या उत्सवापूर्वी रस्ते, गणेशघाट, गर्दी, निर्माल्य, डिजे, डॉल्बी, आदी बाबतीत प्रशासनाने काय काय उपाययोजना करण्यात या बाबतीत शासनाकडून बैठका, चर्चा, आढावा घेतला जातो,परंतु तरीही केवळ कल्याण डोंबिवली, मुरबाड, टिटवाळा, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर या परिसराचा विचार केला तरी, जागोजागी कच-याचे ढिग, त्यातून वाहणारे दुर्गंधीयुक्त पाणी, रस्त्यावरील खड्डे, दोन्ही बाजूला खचाखच भरलेला चिखल अशा विविध संकटातून'विघ्नहर्त्याला निरोप द्यावा लागला, शहाड, धोबीघाट, म्हारळ, वरप, कांबा, रायते, मानिवली, उबांर्णी,बल्याणी, मोहने, टिटवाळा, गुरवली, अशा ब-याच ठिकाणी अशीच परिस्थिती होती. त्यामुळे याचा गणेशभक्तांना मोठा त्रास झाला. यामुळे त्यांनी संताप व्यक्त केला.

आसनगाव जवळील मुंडेवाडी गावचे३तरुण भांरिगे नदीत बुडाले, यातील एकाला वाचवण्यासाठी५जण पाण्यात उतरले, यापैकी३वाहून गेले, प्रतिक मुंडे याचा मृतदेह सापडला परंतु दत्ता लोठे, कुलदीप झाकिरे यांचा शोध जीवरक्षक व शहापूर पोलीस घेत आहेत.

तर आज सकाळी कल्याण हून आळेफाटा येथे गणेशोत्सवानंतर घरी जात असताना एम एच२०,बीएल २९७१या बसला अपघात झाला, यामध्ये२प्रवासी गंभीर जखमी झाले, त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे तर उर्वरित प्रवाशांना दुसऱ्या बसने पुढे पाठविण्यात आल्याची माहिती मिळाली. दरम्यान या बसमध्ये नेमके किती प्रवासी होते, बसचा अपघात कसा झाला याबद्दल सविस्तर माहिती मिळाली नाही.दरम्यान राज्यात विविध प्रकारच्या घटनामध्ये आतापर्यंत९गणेशभक्ताचा मृत्यू झाला असून यामुळे गणेशोत्सवाला गालबोट लागले आहे.

# केडीएमसीच्या प्रसुतीगृहात नवजात बाळाचा मृत्यू

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या वसंत व्हली सुतिका गृहात नवजात बालिकेचा मुत्यु झाल्याची घटना रविवारी सकाळी घडली. या घटनेत डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांचा निष्काळजीपणामुळे बाळाचा मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाईकाकडून झाल्याने वसंत व्हली सुतिका गृहाचा गलथान कारभार चव्हाट्यावर आल्याने केडीएमसी आरोग्य विभाग वादाच्या भोवर्यात सापडला आहे.



### डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांचा निष्काळजीपणामुळे बाळाचा मृत्यू झाल्याचा आरोप

कल्याण पूर्वेतील पिसवली परिसरात राहणाऱ्या अजरूद्दीन सोबराती मनसुरी यांची पत्नी तसलीमा मनसुरी ही नऊ महिन्याची गरोदर होती. तीला प्रसुतीसाठी शनिवारी पाहाटे 4 वा.सुमारास वसंत व्हली येथील केडीएमसीच्या सुतिका गृहात नेण्यात आले. सकाळी 8.48 वा.सुमारास सुमारास डिलीव्हरी होवुन मुलगी झाली. एक दिवसाआधी तसलीमा खातून नावाच्या महिलेला कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या वसंत व्हॅली प्रसूतिगृहामध्ये महिलेची सकाळी प्रसूतीसाठी दाखल करण्यात आले होते. प्रसूती नंतर त्यांना एक मुलगी झाली. बाळाला काही कोप्लिकेशन असल्याने बाळाला डॉक्टरांनी ऑक्सिजन वर ठेवण्याचा सल्ला देत त्या बाळाला ऑक्सिजनवर ठेवण्यात आले.

पण दुसऱ्या दिवशी म्हणजे आज सकाळी त्या बाळाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. यावरून त्यांच्या नातेवाईकांना हॉस्पिटल मध्ये मोठा गोंधळ घातला व बाळाचा मृत्यू हा केडीएमसीच्या रुग्णालय डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांच्या हलगर्जी पणामुळे झाल्याचा आरोप केला आहे. त्याच बरोबर बाळाचे वडील अजरुद्दीन मनसुरी यांनी खडकपाडा पोलिसात तक्रार दिली आहे. त्याच बरोबर केडीएमसी प्रशासनाशी या घटनेसंदर्भात संपर्क केला असता. बाळाचा पोस्टमार्टमचा अहवाल आल्यानंतर कारवाई करण्यात येईल असे आरोग्य विभागाचे उपायुक्त प्रसाद बोरकर यांनी स्पष्टीकरण दिले आहे.

शिवसेना कल्याण ग्रामीण आरोग्य विभाग तालुका प्रमुख अमित कोळेकर यांनी देखील करदाते नागरिकांच्या आरोग्य सुविधा प्रश्नी प्रशासन हतबल का, असा निष्काळजीपणा होत असेल तर दोषींवर कारवाई झाली पाहिजे अशी मागणी यानिमित्ताने केली आहे.

केडीएमसी मुख्य वैघकीय आधिकारी डॉ. दिपा शुक्ला यांनी सांगितले की, वैद्यकीय अहवालानंतर मृत्यूचे कारण समजेल त्यानंतर त्याअंती योग्य असल्यास कारवाई बाबत कारवाई होईल. वसंत व्हली सुतिका गृहात बाळासाठी अतिदक्षता विभाग नसून शास्त्रीनगर रूग्णालय येथे बाळासाठी अतिदक्षता विभाग असल्याचे सांगितले. या घटनेतील आरोपामुळे आरोग्य विभागाचा सावाळा गोंधळ कारभार चव्हाट्यावर आला असून, मनपा रूग्णालयातील तज्ञ डॉक्टर, सोयी सुविधा प्रश्न ऐरणीवर आला असून वसंत व्हॉली सुतिका गृहात बाळासाठी तातडीने अतिदक्षता विभाग सुरू करण्यात यावा अशी मागणी जोर धरू पाहत आहे.

# प्रा. डॉ. मधुकर साळुंखे यांना 'शिक्षक रत्न' पुरस्कार प्रदान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : भाऊसाहेब नेने महाविद्यालय पेण येथील प्राध्यापक डॉ. मधुकर हेमराज साळुंखे (रसायनशास्त्र विभाग) यांना त्यांच्या उत्कृष्ट अध्यापन, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान, सामाजिक कार्य यासाठी या वर्षाचा साहित्यसंपदा, पेणचा शिक्षक रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. प्राध्यापक डॉ.मधुकर साळुंखे यांचे शिक्षण क्षेत्रात 32 वर्षाचे योगदान आहे. या प्रदीर्घ शैक्षणिक वाटचालीत त्यांनी मार्गदर्शन केलेले अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रात मोठ्या हूद्द्यावर कार्यरत असून नावलौकिक मिळवत आहेत. शैक्षणिक कार्याबरोबरच त्यांचे सामाजिक क्षेत्रातही मोठे योगदान आहे. वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धन, रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी शिबिरे, व्यसनमुक्ती, मतदार जनजागृती, एड्स विरोधी जनजागृती, हुशार व गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत यात त्यांचे फार मोठे योगदान आहे.5 सप्टेंबर या शिक्षक दिनानिमित्त त्यांना या पुरस्काराने गौरवण्यात आले.



> गुणवत्ता पूर्ण शिक्षण देणे, उच्च जीवनमूल्य शिकवणे आणि आदर्श भावी पिढी घडवणे, अशा पद्धतीने सेवा देत आलो असून शिक्षकाच्या सेवेची हीच मूल्ये असायला हवीत, अशा पद्धतीने शिक्षक म्हणून कार्य केल्यास निश्चितच विकसित राष्ट्र उभारणीस त्याचा हातभार लागेल. माझ्या या पुरस्कारामध्ये अनेक मार्गदर्शकांचा आणि माझ्याबरोबर काम करणाऱ्या सहयोगींचे, विद्यार्थ्यांचे मोठे योगदान आहे
> - प्रा.डॉ.मधुकर साळुंखे

# राममारुती महाराजांच्या पुण्यतिथी उत्सवात सहभागी व्हा

## अध्यक्ष शिरीष गडकरी यांचे आवाहन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याणमधील श्री संत राममारुती महाराज यांचा १०७वा पुण्यतिथी उत्सव सोमवार दि. ८ सप्टेंबर ते सोमवार दि. १५ सप्टेंबरपर्यंत श्री राममारुती मंदिरात होणार आहे. यानिमित्त विविध कार्यव्रâमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवात अखंड नामस्मरण (पहारा), कीर्तन, भजन, प्रवचन, व्याख्यान, संगीत, प्रबोधनपर व शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप इत्यांदी कार्यक्रम होणार आहेत. या सर्व कार्यव्रâमास व महाप्रसादास उपस्थित राहण्याचे आवाहन राममारुती समाधी संस्थानचे अध्यक्ष शिरीष गडकरी यांनी केले आहे.



सोमवार ८ सप्टेंबर रोजी `श्रींचे समाधी व पादुकांवर' लघुरुद्राभिषेक, पंचामृत महापूजा, पादुकांची स्थापना होणार आहे. ९ सप्टेंबर रोजी श्री रामनाम जप, नाथपंथी होम हवन, सांस्कृतिक व पारंपारिक कार्यक्रम तसेच श्री सुंदरकाण्ड होणार आहे. १० सप्टेंबर रोजी श्री गणपती अथर्वर्शिषाची सामुदायिक आवर्तने, श्री ज्ञानेश्वरी पारायण, ११ सप्टेंबर रोजी श्रीनामाचा तास, श्रीमद् भगवद्गीता पठण, १२ सप्टेंबर रोजी श्री दुर्गा सप्तशती, भक्तीनाट्य रंग, आर्ट ऑफ लिव्हींग संत्सग, १३ सप्टेंबर रोजी श्री विष्णुसहस्त्रनाम, भारुड, गोंधळ, जोगवा, दिडीं व भक्तीगीतांचा कार्यक्रम, १४ सप्टेंबर रोजी श्री रामरक्षा स्त्रोत्र, हनुमान चालिसा, समर्थ उपासना तसेच `तुझ्या कृपेने' हा हिंदी मराठी गितांचा कार्यक्रम, प्राची गडकरी यांचे व्याख्यान, प्रतिक फणसे आणि सहकारी यांची संगीत सेवा, १५ सप्टेंबर रोजी श्री राममारुती महाराज यांचा पवित्र प्रयाणकाळ, काल्याचे कीर्तन व ` श्रीं 'पादुकांची पालखीतुन भव्य मिरवणुक व आरती, प्रसाद, सायंकाळी श्रींची पादुकांची पालखीतुन शोभा यात्रा काढण्यात येणार आहे. उत्सवकाळात दररोज भजन, वारकरी कीर्तन, हरिपाठ इत्यांदी होणार आहे. तरी या सर्व कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पडघा परिसरातील दहा दिवसांच्या बाप्पाचे उत्साहात विसर्जन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथील दहा दिवसांच्या गणपंतीचे साश्रु नयनांनी उत्साहात विसर्जन करण्यात आले.

दहा दिवस वास्तव्य असलेल्या गणपतींचे नागरीकांनी पारंपारिक वेशभूषेत व सर्वांनी भगव्या टोप्या परिधान करून "गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या" अशा घोषणा देत सजविलेल्या हातगाडी, खाजगी चारचाकी, टेम्पो मधुन ओहळ व कुंभेरी नदीवरील गणेश घाटावर टाळ मृदूंगाच्या गजरात, वाजत, गाजत गणपती आणुन मोठ्या भक्तीभावाने साश्रु नयनांनी शनिवारी विसर्जन केले यावेळी नागरीकांनी महीलांनी, गाण्यावर ठेका धरून सर्वाचेंच लक्ष वेधुन घेतले होते.तर पावसाचे सावट असुनही गणेशभक्तांचा उत्साह ओसंडून वाहत होता. यावेळी दोन्ही गणेश घाटावर पडघा ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच रविंद्र विशे उपसरपंच मयुरेश गंधे, ग्रामपंचायत अधीकारी भास्कर घुडे ग्रामपंचायत कमीटी यांच्या मार्गदर्शनाखाली मंडप, आरती टेबल, पिण्याचे पाणी, पुरेशी विजेची व्यवस्था करण्यात आली होती तर कुठेही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पडघा पोलीस ठाण्याचे वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता तसेच गणेश घाटावर ग्रामपंचायतीच्या वतीने चोख व्यवस्था ठेवण्यासाठी ग्रामपंचायत सर्व कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली.यावेळी दोन्ही गणेश घाटावर ५५ गणपंतीचे विसर्जन करण्यात आले.

# मुरबाड तालुक्यातील शिवळे महाविद्यालयात सुरक्षारक्षक भरतीचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाच्या उपक्रमांतर्गत आणि पसारा ऍक्ट 2005 च्या नियमांनुसार मुरबाड तालुक्यातील युवकांसाठी मोठी रोजगारसंधी उपलब्ध झाली आहे. शिवस्वराज्य सेक्युरिटी अँड मॅन पॉवर सर्विसेस (आयएसओ व पसारा मान्यताप्राप्त) आणि जनसेवा शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शांतारामभाऊ घोलप कला, विज्ञान व गोटीरामभाऊ पवार वाणिज्य महाविद्यालय, शिवळे (ता. मुरबाड, जि. ठाणे) येथे 9 ते 13 सप्टेंबर 2025 या कालावधीत सुरक्षा रक्षक भरतीचे आयोजन करण्यात आले आहे.

भरती प्रक्रिया सकाळी 8 ते दुपारी 1 या वेळेत पार पडणार असून स्थानिक बेरोजगार युवकांना कायमस्वरूपी नोकरीची संधी मिळणार आहे. निवड झालेल्या उमेदवारांना पीएफ, मेडिकल सुविधा, ग्रॅच्युइटी, पेन्शन, विधवा पेन्शन, अनाथ पेन्शन तसेच नियमानुसार इतर भत्ते दिले जाणार आहेत. वेतन महाराष्ट्र गार्ड बोर्ड व महाराष्ट्र मिनिमम वेज नियमांनुसार 15,000 ते 23,000 रुपये मासिक वेतन राहील. भरती झालेल्या उमेदवारांची नेमणूक महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये केली जाणार असून सर्व सरकारी नियमांनुसार सुविधा दिल्या जातील. जागा भरल्यानंतर भरती प्रक्रिया तत्काळ बंद केली जाईल, असे आयोजकांनी सांगितले आहे. "ही सुवर्णसंधी जास्तीत जास्त सुशिक्षित बेरोजगार युवकांनी घ्यावी," असे आवाहन प्राचार्य डॉ. एम. ए. बडगुजर, प्लेसमेंट सेल प्रमुख बाळासाहेब अहेर व भरती अधिकारी महेश सरतापे यांनी आवाहन केले आहे.

# धसईत बाजारपेठेतील रस्त्यावरील अनधिकृत टपऱ्या हटवा : मनसेची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : देशातील पहिले कॅशलेस गाव म्हणून ओळखले जाणारे मुरबाड तालुक्यातील धसई गाव सध्या बाजारातील वाहतूक कोंडीच्या समस्येला सामोरे जात आहे. रस्त्याच्या कडेला आणि चौकात वाढलेल्या अनधिकृत टपऱ्या आणि ठेल्यांमुळे रहदारीत अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात वाहनांची कोंडी होत असून विद्यार्थी, नागरिक आणि प्रवाशांना प्रचंड गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे.

या समस्येकडे लक्ष वेधत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे मुरबाड तालुका उपाध्यक्ष आकाश दळवी, तालुका संघटक प्रणव भिडे,तालुका सचिव गिरीश म्हाडसे यांनी ग्रामपंचायत धसई यांना लेखी निवेदन दिले. निवेदनात त्यांनी



स्पष्ट केले की, रस्त्यावर आलेल्या अनधिकृत टपऱ्या आणि ठेले तात्काळ हटवावेत, अन्यथा मनसे ग्रामपंचायत कार्यालयात आंदोलनाचा मार्ग अवलंबेल.

धसई हे तालुक्यातील महत्त्वाचे व्यावसायिक केंद्र असून येथे दररोज शेकडो वाहनांची वर्दळ असते. मात्र, अनधिकृत टपऱ्यांमुळे निर्माण झालेली वाहतूक कोंडी ही केवळ खरेदीदारांनाच नव्हे तर स्थानिक रहिवाशांनाही त्रासदायक ठरत आहे.ग्रामपंचायत या संदर्भात कोणती कार्यवाही करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कल्याण शहरातील वाहतूक प्रकल्पांना गती द्या

## खासदार श्रीकांत शिंदे यांच्या एमएमआरडीएला सूचना

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण लोकसभा मतदारसंघातील विविध महत्वाकांक्षी प्रकल्पांबाबत एमएमआरडीए मुख्यालयात एक महत्वाची बैठक पार पडली. यावेळी कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी बैठकीत मतदारसंघात सुरू असलेल्या वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाच्या प्रकल्पांचा आढावा घेतला. तसेच या प्रकल्पांना गती देण्याच्या सूचना देखील केल्या. यावेळी एमएमआरडीए आयुक्त डॉ.संजय मुखर्जी, एमएसआरडीसी व्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड, एमएमआरडीए अतिरिक्त आयुक्त अश्विन मुदगल यांची मुख्य उपस्थिती होती.



यावेळी बैठकीत अंबरनाथ येथे रेल्वे स्थानक परिसरात सुमारे ८० कोटी रुपयांच्या निधीतून सॅटिस उभारण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या उभारणीसाठी लागणाऱ्या जागेबाबत यावेळी आढवा घेतला.

डोंबिवली आणि टिटवाळा या दोन्ही शहरांतील अंतर कमी करण्यासाठी कल्याण रिंग रोड हा मार्ग महत्वाचा ठरणार आहे. या प्रकल्पाची आठ टप्प्यांमध्ये उभारणी करण्यात येत आहे. यातील टप्पा - ४ (दुर्गाडी ब्रिज ते गांधारे ब्रिज), टप्पा - ५ (गांधारी ब्रिज ते मांडा जंक्शन), टप्पा - ६ (मांडा जंक्शन ते टिटवाळा जंक्शन), टप्पा - ७ (टिटवाळा जंक्शन ते एसएच ३५-४० रोड जंक्शन) या टप्प्यांचे काम जवळपास पूर्ण झाले असून यातील बहुतांश रस्ता सध्या वापरला जातो आहे. टप्पा - ३ (मोठा गाव ते गोविंदवाडी बायपास रोड) या रस्त्याचे काम प्रगतीपथावर असून येत्या काही महिन्यात याचे काम लवकरच पूर्ण होणार आहे.

तर यातील टप्पा - १ (हेदुटणे ते शिळ रोड) या मार्गाच्या उभारणीसाठी लागणाऱ्या जागेचे भूसंपादन सुरु आहे. तर टप्पा - २ (शीळ रोड ते मोठागाव ब्रीज) या नियोजित मार्गाचे नव्याने आरेखन करण्यात आले असून, यानुसार काम जलदगतीने पूर्ण करावे.

वाहतुकीचा ताण कमी व्हावा आणि नागरिकांचा प्रवास अधिक सुखकर व्हावा यासाठी शिळफाटा - रांजनोली येथे द्विस्तरिय (डबल डेकर) रस्ता उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या रस्त्याची उभारणी साठी जलदगतीने निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो ५ प्रकल्प आता दुर्गाडी नाका ते कल्याणमार्गे उल्हासनगरच्या कल्याण - बदलापूर मार्गाने बदलापूर आणि अंबरनाथ शहराच्या मध्यभागी उभे राहत असलेल्या चिखलोली रेल्वे स्थानकापर्यंत नेण्यात येणार आहे. याबाबत एमएमआरडीएकडून आराखडा तयार करण्यात येत असून याबाबत आज आढावा घेऊन याचे काम वेगाने करण्याबाबत सूचना केल्या.

मेट्रो १२ चे काम देखील सध्या जलदगतीने सुरू आहे. यातील मार्गात पिलर उभारणीचे, तसेच स्थानक उभारणीचे काम सुरू आहे. कल्याण लोकसभेत उभारण्यात येणाऱ्या एक्सेस कंट्रोल मार्गाच्या उभारणीचा आढावा घेतला. या मार्गाच्या आरेखनाबाबत यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

डोंबिवली येथे देखील सॅटिस प्रकल्पाची उभारणी करण्यात यावी. यासाठी आराखडा तयार करण्याच्या सूचना यावेळी दिले.यामुळे स्थानक परिसरातील कोंडी सुटण्यास मदत होणार आहे. यू टाईप रस्ता, इतर महत्वाच्या रस्त्यांच्या निविदा प्रक्रिया वेगाने राबवण्याचा सूचना यावेळी केल्या.

याप्रसंगी कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे, कल्याण पश्चिमचे आमदार विश्वनाथ भोईर, ठाणे महापालिकेचे आयुक्त सौरभ राव, कल्याण डोंबिवली महापालिकेचे आयुक्त अभिनव गोयल, विविध महापालिका, प्रशासकीय संस्था यांचे अधिकारी, अभियंते तसेच शिवसेनेचे पदाधिकारी शिवसेना पदाधिकारी उपजिल्हा प्रमुख राजेश कदम, रवी पाटील, रमाकांत देवळेकर, निलेश शिंदे, रमाकांत मढवी, बाबाजी पाटील, राजन मराठे, नितीन पाटील, सागर जेधे, कुणाल भोईर आदी मान्यवर उपस्थित होते.




# केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या पेन्शन नियमांमध्ये बदल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने नुकतेच जीएसटीच्या स्लॅबमध्ये बदल करून जनतेला मोठे गिफ्ट दिले आहे. नव्या निर्णयानुसार २८ टक्के आणि १२ टक्के असे जीएसटीचे दोन स्लॅब रद्द करण्यात आले आहेत. तर आता १८ टक्के आणि ५ टक्के असे दोनच जीएसटी स्लॅब असणार आहेत. केंद्र सरकारच्या जीएसटीच्या या नव्या धोरणामुळे सर्वसामान्य लोकांना मोठा दिलासा मिळाला असून, यामुळे अनेक वस्तू स्वस्त होणार आहेत. अनेक जीवनावश्यक वस्तूंवर आता केवळ ५ टक्के जीएसटी लागणार आहे. ही देशातील जनतेसाठी केंद्र सरकारची मोठी भेट मानली जात आहे. मात्र आता दिवाळीपूर्वी केंद्र सरकारने आणखी एक मोठे गिफ्ट दिले आहे. मोदी सरकारने मोठी घोषणा केली आहे. केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी सरकारने ही आनंदाची बातमी दिली आहे, केंद्र सरकारकडून केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या पेन्शनच्या नियमांमध्ये मोठा बदल करण्यात आला आहे. नव्या नियमानुसार केंद्रीय कर्मचाऱ्यांना आता वीस वर्षे सेवा जरी झाली तरीही पेन्शनचा लाभ मिळणार आहे. पूर्वी २५ वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर पेन्शन मिळायची.नव्या पेन्शन योजनेनुसार आता कर्मचाऱ्यांना वीस वर्षे जरी नियमित सेवा झाली तरी देखील निवृत्तीनंतर मिळणारे सर्व लाभ मिळणार आहेत. त्यांना पेन्शन देखील मिळणार आहे. पूर्वी ज्या कर्मचाऱ्यांनी आपल्या सेवेची नियमितपणे २५ वर्षे पूर्ण केली आहेत, अशाच कर्मचाऱ्यांना पेन्शनचा लाभ मिळायचा. मात्र आता या नियमामध्ये बदल करण्यात आला आहे.

# देशी दारूची तस्करी करणाऱ्या तरुणाला अटक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण आरपीएफच्या सीपीडीएस पथकाने कल्याण स्थानकावरून देशी दारूची तस्करी करणाऱ्या एका तरुणाला अटक केली आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, राहुल गायकवाड नावाच्या या तरुणाला आरपीएफने दुसऱ्यांदा पकडले आहे. आरपीएफचे सीपीडीएस पथकाचे जवान अनिल उपाध्याय, भगवान पाटील आणि पंकज पाखले कल्याण स्थानकावर ड्युटीवर होते. एका प्लॅटफॉर्मवरून दुसऱ्या प्लॅटफॉर्मवर जाणाऱ्या पुलावर एक तरुण मोठी बॅग घेऊन जाताना दिसला. आरपीएफ जवानांनी त्या तरुणाला ओळखले. राहुल गायकवाड नावाच्या या तरुणाला आरपीएफने यापूर्वीही अटक केली होती. त्यावेळी त्याच्याकडे असलेल्या बॅगची झडती घेतली असता त्यातून मोठ्या प्रमाणात देशी दारूचे पाउच जप्त करण्यात आले. त्याच्याकडे सुमारे ३२ लिटर देशी दारू होती. सीपीडीएसटीने ताबडतोब राहुलला ताब्यात घेतले. गेल्या वेळीही राहुलला त्याच प्रमाणात आणि त्याच ठिकाणाहून ताब्यात घेण्यात आले होते. राहुल गायकवाड हा कल्याण पूर्वेतील नेतिवली परिसरातील रहिवासी आहे, जो दादरला जातो आणि देशी दारूची तस्करी करतो. सध्या हे प्रकरण कल्याण उत्पादन शुल्क विभागाकडे सोपवण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे. देशी दारूची तस्करी करताना राहुल गायकवाडला दुसऱ्यांदा अटक करण्यात आली आहे. आता यावेळी त्याच्यावर काही ठोस कारवाई होते की नाही हे पाहावे लागेल.

### आमदार कथोरेंच्या वाढदिवसानिमित्ताने

# बाळा घरतांकडून रोपांचे शेतकऱ्यांना वाटप



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे यांच्या येणाऱ्या 19 सप्टेंबरला वाढदिवसाच्या निमित्ताने म्हसा परिसरातील युवा उद्योजक बाळा शेठ घरत व त्यांच्या पत्नी कान्होळ ग्रामपंचायत विद्यमान सरपंच सौ.रेश्मा घरत यांनी गावातील शेतकऱ्यांना एक हजार वृक्ष रोपांचे वाटप आमदार किसन कथोरेंच्या हस्ते आज करण्यात आले आहे.

आमदार कथोरेंच्या वाढदिवसा निमित्ताने संपुर्ण मतदार संघात त्यांचे कार्यकर्ते, चाहते पुर्ण महिनाभर सामाजिक उपक्रम राबवत असतात. त्याच अनुषंगाने युवा उद्योजक बाळाशेठ घरत व त्यांच्या पत्नी सो. सरपंच रेश्मा घरत या दांम्पत्याने हा शेतकऱ्यांच्या व पर्यावरणाच्या हिताचा उपक्रम राबविला आहे.

यावेळी आमदार कथोरे यांनी बोरीवली येथील घरत कुटुंबाच्या श्रीगणेशाचे दर्शन घेतले व उपस्थित शेतकऱ्यांना आंबा, पेरू, कडुनिंब, जांभुळ, चिकू इत्यादी वृक्ष रोपांचे वाटप केले.घरत दांम्पत्याने केलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे आमदार कथोरे यांनी कौतुक केले आहे. तर बाळा घरत यांनी वाढदिवसा निमित्त परिसरातील नागरिकांसाठी लवकरच महा आरोग्य शिबीराचे आयोजन केले जाणार असल्याचे सांगितले.तसेच या भागातील रूग्णांना मुरबाड, उल्हासनगर, कल्याण सारख्या ठिकाणी तातडीने नेण्यासाठी रुग्णवाहिका नसल्याचे अडचण होत असून लवकरच ती सुद्धा उपलब्ध करण्याचा मानस बाळा घरत व्यक्त केला आहे. नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे घरत दांम्पत्याचे परिसरात विशेष कौतुक होत आहे.

यावेळी जिल्हा परिषदेचे मा.सदस्य उल्हास बांगर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुरेश बांगर, रिपाईचे तालुका अध्यक्ष दिनेश उघडे, प्रदिप चौधरी यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# रमेश पाटील यांच्या निवासस्थानी गणेशोत्सव संपन्न



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली(शरद शहाणे) :** सुप्रसिद्ध उद्योगपती, माजी आमदार, अभिनव सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री रमेश रतन पाटील यांच्या निवासस्थानी सालाबाजाप्रमाणे यांनाही दहा दिवसाचा घरगुती गणपती उत्सव संपन्न झाला.

रमेश पाटील यांचा जनसंपर्क मोठा असल्यामुळे दहा दिवस त्यांच्या निवासस्थानी महागणपतीचे दर्शन घेण्यासाठी त्यांचे मित्र मंडळी नातेवाईक, हितचिंतक, आणि व्यवसाय संबंधी अनेकांनी गणपतीचे दर्शन घेतले . दिनांक पाच सप्टेंबर रोजी सत्यनारायणाची महापूजेचे करण्यात आले होते. महागणपतीचे आणि सत्यनारायणाच्या पूजेचा प्रसादाचा लाभ अनेक भक्तांनी घेतला. रोटरी इंडस्ट्रियल क्लबचे पदाधिकारी, अभिनव सहकारी बँकेचे पदाधिकारी आणि सदस्य, आणि काटई, कोळे, हेदूटणे, इथे ग्रामीण भागातून सुद्धा अनेक मित्रमंडळी नी प्रसादाचा लाभ घेतला.

दहा दिवस कीर्तन भजनाचे आयोजन करण्यात आले होते.

# 'भक्ती व सेवेची सांगड घालत'विसर्जन सेवा

## अनिरुद्धाज अकॅडेमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंटकडून सेवा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : गणपती विसर्जनाच्या वेळी दरवर्षी पोलीस यंत्रणा व वाहतूक यंत्रणा यांच्यावर गर्दीला नियंत्रण करण्याचा ताण असतो. दिड दिवस, अडीच दिवस, पाच दिवस, सात दिवस आणि दहा दिवस अश्या विविध दिवसाच्या विसर्जन मिरवणूका सुखरूप पार पडण्यासाठी सरकारी यंत्रणा अथक परिश्रम करीत असतात. आणि हा सरकारी यंत्रणांवरील व पोलिसांचा हा ताण हलका करण्यात अनिरुद्धाज अकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंटची बहुमोल सेवा दर वर्षी गणपती विसर्जनात राबविली जाते.प.पु.सदगुरू अनिरुद्ध बापु यांचे स्वयंसेवक बापुंनी सांगितलेल्या भक्तीमय अशा



सेवेत संपुर्ण महाराष्ट्रातील विसर्जन घाटांवर सहभागी होत असतात. कल्याण शहरातील दुर्गाडी विसर्जन घाटावरही अमाप गर्दी लोटते. येथे खाडी असल्याने कल्याण बरोबरच अगदी शहाड उल्हासनगर येथील मंडळांच्या ऊंच मुर्ती येथेच विसर्जनासाठी येत असतात. सहाजिकच येथे गर्दी नियंत्रणासाठी फार मोठे मनुष्यबळ लागते. अनिरुद्धाज अकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट सामाजिक बांधिलकी राखत भक्तीमय वातावरणात ही सेवा पोलीसांच्या हातात हात घालून ही राबवितात. कल्याण येथील दुर्गाडी गणेश विसर्जन घाटावर गौरी विसर्जन आणि अनंत चतुर्दशी अशी दोन दिवस अनिरुद्ध अकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंटतर्फे ही सेवा राबविली जाते. अनंत चतुर्दशीला एकुण १२४ पुरूष व स्त्री भक्तांनी दुर्गाडी विसर्जन घाटावर सेवा केली. कल्याण, डोंबिवली, शहाड,कोनगाव, मुरबाड, सरळगाव, टिटवाळा,पडघा, वासिंद, आसनगाव व शहापुर येथील बापुभक्तांनी येथे आपली बहुमोल सेवा दिली. विसर्जनासाठी आलेल्या गणेशभक्तांना ते योग्य मार्गदर्शन करीत होते त्यामुळे कुठेही गर्दी गडबड न होता शिस्तबद्धरित्या रित्या गणपती विसर्जन पार पडत होते. भर पावसात स्वयंसेवक आपली सेवा राबवित असताना प्रत्येक जण त्यांचे कौतुक करतांना दिसत होते.विसर्जन स्थळी भेट दिलेल्या पोलिस पदाधिकाऱ्यांनी देखील सेवा करणा-या या स्वयंसेवकांचे कौतुक केले.


महाराष्ट्र शासन
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, मुरबाड यांचे कार्यालय**
**तालुका-मुरबाड जिल्हा-ठाणे**
**कार्यालयाचा पत्ता : एम.आय.डी.सी. प्लॉट क्र.१४ ता. मुरबाड जि. ठाणे पिन कोड ४२१४०१**
दूरध्वनी क्र. ०२५२४-२२२१९९ ई-मेल: tahmurbad1@gmail.com

**जाहिर नोटीस**

प्रति,
१) श्री. कमलाकर मंगल गोल्हे
रा. नारीवली, बांगरपाडा
ता. मुरबाड, जि. ठाणे.................................अर्जदार
विरुद्ध
२) ग्रामपंचायत नारीवली
जन्म मृत्यु नोंदणी विभाग,
ता. मुरबाड, जि. ठाणे ..............................सामनेवाले

तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे सुचीत करण्यात येते आहे ते येणेप्रमाणे:

१. उपरोक्त अर्जदार यांचे आजी कै. वाराबाई लक्ष्मण गोल्हे, यांचा मृत्यु दिनांक १५/०८/१९७८ रोजी राहत्या घरी मु. बांगरपाडा, ता. मुरबाड, जि. ठाणे येथे झालेला आहे. अर्जदाराकडून काही अपरिहार्य कारणांमुळे तसेच अनावधनामुळे सदर जन्म/ मृत्युची नोंद निबंधक, जन्म, मृत्यु नोंदणी विभाग, ता. मुरबाड, जि. ठाणे दप्तरी करुन जन्म/ मृत्युचा दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहिला होता. अर्जदार यांना त्यांच्या काही वैयक्तिक कारणांसाठी मृत्यु दाखल्याची आवश्यकता आहे.
२. उशीरा मृत्युची नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडुन आदेश प्राप्त करून घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास किरकोळ अर्ज क्र. ६०३० दाखल केला आहे.
३. सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणताही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना सदर कार्यालयातर्फे यांचे आजी यांचा मृत्युच्या नोंदणीचा दाखला मिळणे करीता आदेश करण्यात येईल.

आज दिनांक माहे ०४/०९/२०२५ रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली.

शिक्का

सही /-
हुकमावरुन
(श्रीम. सुषमा अव्हाड- बांगर)
निवासी नायब तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, मुरबाड

जा.क्र. फौजदारी/जन्म मृत्यु नोंद / कावि ५७१/२०२५


# सेवा क्षेत्रातील कामगारांना बारा तासाची ड्युटी योग्य आहे का?

## कामगारांचे शोषण थांबले पाहिजे - सी आर म्हात्रे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : आजच्या औद्योगिक,व्यापारी जीवनात गंभीर प्रश्न पुढे आला आहे. कारखाने,दुकाने ,मॉल्स, हॉटेल किंवा विविध सेवा क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना १२ तास ड्युटी लावणे योग्य आहे का? हा प्रश्न केवल कामगारांच्या जीवनाशी संधीत नाही तर समाजाचे आरोग्य,कुटुंब संस्था, अर्थव्यवस्था यांच्या चौकटीशी निगडित आहे. असे प्रांजल मतं पेण वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी व्यक्त केले आहे.

भारतातील फॅक्टरी ऍक्ट १९४८ व शॉप ॲन्ड एस्टॅब्लिशमेंट ऍक्ट यामध्ये कामाच्या तासाचा स्पष्ट उल्लेख केला आहे की कामगारांना ८ तासांपेक्षा जास्त काम असता कामा नये जर तसे केले तर ओव्हरटाईम देणे बंधनकारक आहे. आणि आठवड्याला ४८ तासाची मर्यादा आहे. आणि आत्ता जर सरकारने ठरविले आहेच तर ती आठवड्याला ४८ तासा ऐवजी ६० तास होतील हे कायदेशीर दृष्ट्या चुकीचे ठरेल. असेही सांगितले.

अनेक कंपन्या कामगारांच्या संमतीने १२ तास ड्युटी करून घेतात.मात्र कामगारांना संमती देण्याशिवाय पर्याय नसतो कारण बेरोजगारी आहे...त्यांना पर्यायी कामगार भेटतात.,हे त्यांचे कायदेशीर शोषण आहे.१२ तासाचे काम कामगाराच्या मनावर ,आरोग्यावर मोठा परिणाम करणारा ठरेल.दीर्घकाळ उभे राहून किंवा बसून पाय सुजणे,कंबर दुखी,सतत मानसिक ताण,नैराश्य,झोपेची कमतरता,यामुळे अपघाताची शक्यता वाढीस लागेल.

उच्च रक्तदाब,हृदय विकार,मधुमेह असे आजारवाढीस लागतील असे डॉक्टरांचे मत आहे.८ तास ड्युटी. ही मानवी शरीराच्या मर्यादित व आरोग्यस्नेही कालावधी आहे.१२ तास ड्युटी म्हणजे दिवसाचा अर्धवेळ बाहेर उरलेला वेळ प्रवास,घरकाम झोप हे वेळापत्रक बिघडवून टाकणार आहे. कुटुंबासाठी वेळ देता येणार नाही, मुलांवर, शिक्षणावर,लक्ष देता येणार नाही. सांस्कृतिक,सामजिक जीवनात सहभाग राहणार नाही थोडक्यात तणावग्रस्त मन यामुळे मुलांकडे दुर्लक्ष होईल हे नक्की. तो समाजापासून दूर फेकला जाईल.

व्यापारी,उद्योजक यांना सोयीस्कर बारा तासाची ड्युटी लावणे सोपे होईल उत्पादनखर्च घटेल,सततचा मनुष्यबळ तुटवडा भरून काढता येईल . मात्र हे सर्व युक्तिवाद नफेखोरीसाठी आहेत.

मात्र सरकारने ८ तासाची ड्युटी देऊन कामचुकार कामगारांवर जरब बसवावा.आणि हे जर शक्य नसेल १२ तासाची ड्युटी लागू केली तर त्या ४. तासाचा दुप्पट वेतन देय करावा. कामगारांना साप्ताहिक विश्रांती द्यावी..असा कामगार हिताचा कायदा करावा. अशी मागणी केली आहे.

कामगार संघटनांनी,नागरी संस्थांनी कामगारांच्या हितासाठी आवाज उठविला पाहिजे.समाजानेही कामगारांना साथ दिली पाहिजे. एकंदरीत काय तर व्यापारी उद्योजक यांना ही बारा तासाची ड्युटी फायदेशीर असली तरी कामगारांच्या आरोग्याचे दूरगामी परिणाम करणारी ठरेल.

वास्तविक कामगार हा लोकशाहीच्या विकासाचा पाया आहे. तेव्हा त्याच्या सन्मानाचा विचार झाला पाहिजे.त्याला गुलामासारखी वागणूक नको. सरकारने तीनचार तास वाढविले ते कमी करता येत असतील तर विचार केला तर बरे होईल.कामगार म्हणजे पुरुष कामगार ,यांच्या बरोबर महिला कामगार आहेत त्याने त्यांना ही बारा तासाची ड्युटी फायदेशीर नाहीच.त्यांचा पण विचार झाला पाहिजे. अशी मागणी सी आर म्हात्रे यांनी केली आहे.

# मुंबई नाशिक महामार्गावर ट्रकच्या धडकेत

# बाप- लेकीचा दुर्दैवी मृत्यू

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : भिवंडी तालुक्यातील मुंबई नाशिक महामार्गावर ट्रकच्या धडकेने एका बाप- लेकीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

राजेश अधीकारी (३९) वेदीका अधीकारी (११) रा. सरलांबे ता. शहापुर असे अपघातात मृत्युमुखी पडलेल्या बाप - लेकीचे नावे असुन दोघेही शुक्रवारी भिवंडी तालुक्यातील सापे गावातील नातेवाईकांकडे गणपती दर्शनासाठी गेले होते देवदर्शन आटोपून सायंकाळी आपल्या मोटारसायकलने मुंबई नाशीक महामार्गावरून आपल्या सरलांबे येथील घरी परतत असताना डोहोळे गावाच्या हद्दीतील शहापुर बाजुकडील मुंबई नाशीक महामार्गावर साईधारा लॉजेस्टीक समोर मागुन आलेल्या भरधाव ट्रकने त्यांना जोरदार धडक दिली यात बापाचा जागेवरच मृत्यू झाला तर गंभीर जखमी झालेल्या मुलीला दवाखान्यात नेत असताना मृत्यू झाला.दोघांचेही मृतदेह पडघा प्राथमिक आरोग्य केंद्रात आणण्यात आले होते यावेळी डॉक्टरांनी शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांकडे सुपूर्द केले. तर ऐन गणेशोत्सव काळात अपघातात बाप- लेकीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने सरलांबे गावात शोककळा पसरली आहे. सदर अपघाताचा गुन्हा पडघा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला असुन अधीक तपास पोलीस करीत आहेत.

# 'पुढच्या वर्षी लवकर या'जयघोषात ओतूर परिसरात गणरायाला निरोप

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ओतूर** : जुन्नर तालुक्यातील ओतूर परिसरात गणेश विसर्जन सोहळा मोठ्या उत्साहात, भक्तिभावाने आणि सांस्कृतिक दिमाखात पार पडला. ओतूर शहरासह ग्रामीण भागातील हजारो गणेश भक्तांनी गणरायाला निरोप देताना पारंपरिक वाद्यांच्या गजरात, ढोल-ताशांच्या गगनभेदी निनादात, झांज-मृदंगाच्या तालावर, तसेच "गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या"च्या जयघोषात सहभागी होऊन वातावरण दुमदुमून टाकले.

ओतूर शहरातील पांढरीचा राजा गणेश उत्सव मंडळ, होळी चौकातील चैतन्य गणेशोत्सव मंडळ, धान्य बाजार पेठेतील सत्यशोधक गणेशोत्सव मंडळ,



मार्केट यार्डचे अखिल मंडई गणेशोत्सव मंडळ, वरील आळीचे नवोदित गणेश मंडळ, बाजार पेठेतील संताजी गणेश मंडळ यांसह शहरातील अनेक मंडळांनी भव्य मिरवणुका काढल्या. तसेच तांबेमळा, नंदकर वस्ती, जाकमाथा, कोळमळा, फुलेमळा यांसारख्या वस्ती-गावांमधील मंडळांनीही दिमाखदार मिरविणका काढल्या. याशिवाय रोहोकडी, आंबेगव्हाण, चिल्हेवाडी, धोलवड, हिवरे खुर्द, डुंबरवाडी, खामुंडी, मढ, खुबी, करंजाळे, ठिकेकरवाडी, नेतवड, बल्लाळवाडी, उंब्रज, उदापूर, डिंगोरे, कोपरे, मांडवे आदी गावांमधील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे तसेच घरगुती गणपतींचेही विसर्जन आनंद चतुर्थी (मंगळवार, दि. ६ सप्टेंबर) रोजी भक्तीभावाने करण्यात आले.

मिरवणुकीदरम्यान स्थानिक मंडळांनी विविध सामाजिक, शैक्षणिक व पर्यावरणपूरक संदेश देणारे देखावे सादर केले. पारंपरिक लेझीम पथकांचे ताल, तसेच मुलांच्या पारंपरिक वेशभूषेतल्या उपस्थितीमुळे संपूर्ण सोहळा रंगतदार व दैदिप्यमान झाला.

गणरायाच्या मूर्तींचे विसर्जन करताना भक्तांच्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते, मात्र "बाप्पा पुन्हा येणार" या दृढ श्रद्धेने वातावरणात भावनिक ओलावा निर्माण झाला. पुढील वर्षी बाप्पा लवकर यावेत या आशेने "पुढच्या वर्षी लवकर या" अशा आरोळ्यांनी आकाश दणाणून गेले.

गणेश विसर्जन सोहळा हा केवळ धार्मिक विधी न राहता तो सामाजिक ऐक्य, उत्साह आणि श्रद्धेचा महापर्व ठरला.






# डॉ. संदीश जयभाये यांना जेएमएफ शिक्षाविद् पुरस्कार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : शिक्षक दिनाच्या दिवशी जह्वीस मल्टी फाऊंडेशन आणि वंदेमातरम कॉलेज, डोंबिवली यांच्या संयुक्त विद्यमाने जेएमएफ शिक्षाविद् पुरस्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात कल्याणच्या बी. के. बिर्ला कॉलेज मधील सहयोगी प्राध्यापक डॉ. संदीश जयभाये यांना त्यांच्या उल्लेखनीय वैज्ञानिक कारकिर्दीबद्दल व समाजोपयोगी योगदानाबद्दल या प्रतिष्ठित पुरस्काराने गौरविण्यात



आले. कार्यक्रमाने शिक्षक दिनाचा खरा भाव जपला, ज्यामध्ये विद्यार्थ्यांवर आणि समाजावर मोलाचा प्रभाव टाकणाऱ्या मान्यवर शिक्षक आणि विद्वानांचा सन्मान करण्यात आला. हा पुरस्कार एस. सत्यकुमार, अध्यक्ष व मुख्य कार्यकारी, हेवी वॉटर बोर्ड, अणुऊर्जा विभाग, मुंबई यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. तसेच पद्मश्री गजानन माने यांच्या मान्यवर उपस्थितीने कार्यक्रमास विशेष गौरव प्राप्त झाला.






Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024